मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आमदार महेश लांडगे यांनी मागितली पिंपरी-चिंचवडमधील पटेल समाजाची माफी!

## महापालिकेतील बिल्डर मारहाण प्रकरण

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पिंपरी- चिंचवड महापालिका आवारातच उद्योजक नरेश पटेल यांना मारहाण झाली. त्यामुळे पटेल समाजाचे खच्चीकरण झाले, अशी भावना पटेल समाजाची आहे. आम्ही चुकीच्या गोष्टीचे कधीही समर्थन करणार नाही. आम्ही आपल्या सोबत आहोत. मी सामाजिक कार्यकर्ते नितीन बोऱ्हाडे यांच्या कृत्याबद्दल पिंपरी-चिंचवडचा जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून समाजाची माफी मागतो. या पुढील काळात उद्योजक, व्यावसायिक आणि भूमिपूत्र यांच्यात वादाचा प्रसंग होणार नाही. हातात हात घालून आपण शहराचा विकास करू, असे आवाहन भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी केली. पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पक्षाच्या माजी नगरसेविका सारिका बोऱ्हाडे यांचे पती सामाजिक कार्यकर्ते नितीन बोऱ्हाडे यांनी जमीन



व्यवहारातील वादातून उद्योजक नरेश पटेल यांना महापालिका आवारातच मारहाण केली होती. हा सर्व प्रकार तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला. नितीन बोऱ्हाडे हे आमदार लांडगे यांचे कट्टर समर्थक असल्यामुळे पटेल समाजाचे थेट आमदार लांडगे यांना साकडे घातले.

दरम्यान, बांधकाम व्यावसायिक नरेश पटेल यांच्यासारख्या वादाच्या घटना पुन्हा घडू नयेत. या करिता शहरातील पटेल समाजाने आमदार महेश लांडगे यांची भेट घेतली. भोसरीतील महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशनच्या मैदानावर नवरात्रोत्सव सुरू आहे. त्या ठिकाणी महाआरतीनंतर पटेल समाजाच्या समुहाने लांडगे यांच्यासोबत या प्रकरणावर सविस्तर चर्चा केली. सुमारे दीड हजार समाज बांधवांसमोर आमदार लांडगे यांनी पटेल समाजाची माफी मागितली. तसेच, चुकीच्या गोष्टीचे समर्थन करणार नाही, अशी ग्वाही दिली. यावेळी ‘‘आम्ही गेल्या ३० ते ४० वर्षांपासून या शहरात व्यवसाय करीत आहोत. २० वर्षे आम्ही आपल्याला पाहतो. या पूर्वी असा कधीही प्रकार घडला नाही. शहरात आम्ही तुमच्या भरोशाने व्यावसाय करीत आहोत. त्यामुळे या प्रकरणात तोडगा काढावा’’ असे साकडे पटेल समाजाकडून घालण्यात आले. पटेल समाजाचे दिलीप पटेल म्हणाले की, ‘‘यह पटेल समाज आप के साथ रहा है। हम सब मिलजुल कर काम कर रहें है। पटेल परिवार शांती से रहेता है। महेशदादा आपको इस विवाद में समझोता करना होगा। यावर आमदार लांडगे यांनी माफी मागताच ‘‘दादा आप क्यों माफी मांग रहे हो। हम आप के भरोसे है। आप को माफी मांगने की जरुरत नहीं। अशा शब्दांत पटेल बांधवांनी भावना व्यक्त केल्या. आमदार लांडगे म्हणाले की, गैरसमाजातून किंवा व्यवसायिक वादातून असा प्रकार घडला असेल. नितीन बोऱ्हाडे माझा सहकारी आहे. नरेश पटेल यांच्याबाबत झालेली कृती चुकीची होती. याबद्दल पिंपरी-चिंचवड शहरातील जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून पटेल समाजबांधवांची दिलगिरी व्यक्त करतो. याबाबत नितीन बोऱ्हाडे आणि नरेश पटेल यांची आगामी दोन-तीन दिवसांत एकत्रित बैठक घेवून आणि सामोपचाराने वाद मिटवण्यात येईल. यापुढील काळात असा प्रकार होणार नाही, याची खबरदारी आम्ही घेणार आहोत.

# क्रिकेट सामन्याचे बाराशेचं तिकिट १२ हजारांना !

## क्रिकेट सामन्याचे ‘ब्लॅक’ने तिकीट विकणाऱ्या दोघांना अटक

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।**

गहुंजे येथे गुरूवारी (ता. १९) होत असलेल्या भारत विरुद्ध बांगलादेश क्रिकेट सामन्याचे तिकिट ब्लॅक करणाऱ्या दोघांना पोलिसांनी सापळा रचून अटक केली. आरोपी बाराशे रुपयांच्या तिकिटांची १२ हजार रुपयांना विक्री करीत होते. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने मुकाई चौक, रावेत येथे ही कारवाई केली.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या स्टेडीयमवर वर्ल्डकपचे सामने होणार आहेत. आज भारत विरुद्ध बांगलादेश




हा पहिला सामना होत आहे. या पार्श्वभूमीवर साध्या वेशातील पोलिस क्रिकेट स्टेडीयमच्या आवारात तैनात करण्यात आले आहेत.

दरम्यान, गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला माहिती मिळाली की, मुकाई चौक, रावेत येथे कोहिनूर सोसायटीच्या समोर काहीजण क्रिकेट सामन्याची तिकिटांची जास्त दराने विक्री करीत आहेत. त्यानुसार, पोलिसांनी सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे भारत विरुद्ध बांगलादेश क्रिकेट सामन्याची पाच तिकिटे मिळून आली आहेत.

# महावितरणच्या नवीन भोसरी उपविभाग-२ ची निर्मिती

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** समाविष्ट गावांसह भोसरी विधानसभा मतदार संघातील वीज ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी महावितरणच्या भोसरी विभागातील भोसरी उपविभाग व आकुर्डी उपविभागाचे विभाजन करून नवीन भोसरी उपविभाग-२ची निर्मिती करण्यात आली आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी याबाबत यशस्वी पाठपुरावा केला. त्यामुळे वीज समस्येमुळे त्रास असलेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. महावितरणकडून याबाबतचे मंगळवारी (दि.१७) परिपत्रक जारी करण्यात आले. नव्याने तयार झालेल्या भोसरी उपविभाग-२ चे कार्यालय व त्या अंतर्गत तीन शाखा कार्यालयांमध्ये एकूण ६९ तांत्रिक व अतांत्रिक पदे मंजूर करण्यात आली आहेत. पुणे परिमंडल अंतर्गत भोसरी विभागात यापूर्वी भोसरी, आकुर्डी व प्राधीकरण असे तीन उपविभाग होते. यात भोसरी व आकुर्डी उपविभागाचे विभाजन करून नवीन उपविभाग व त्याअंतर्गत तीन शाखा कार्यालयांची निर्मिती करण्यात यावी यासाठी आमदार आमदार महेश लांडगे यांनी विधानसभा सभागृहात राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. तसेच, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता. पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार म्हणाले की, भोसरी विभागातील भोसरी व आकुर्डी उपविभागात सुमारे २ लाख ७० हजार वीजग्राहक होते. विभाजनानंतर आता भोसरी उपविभाग-१ मध्ये ७२ हजार, भोसरी उपविभाग-२ मध्ये ६८ हजार आणि आकुर्डी उपविभागात १ लाख ३० हजार अशी ग्राहकसंख्या राहणार आहे. तसेच नवीन ६९ तांत्रिक व अतांत्रिक पदांची निर्मिती झाल्यामुळे या सर्व ग्राहकांना आणखी दर्जेदार व सुरळीत वीजसेवा मिळेल.भोसरी विभागाच्या नव्या रचनेत आता भोसरी उपविभाग-१ मध्ये भोसरी गाव, चऱ्होली, नाशिक रोड शाखा आणि नवनिर्मित भोसरी उपविभाग-२ मध्ये इंद्रायणीनगर (नवनिर्मित), मोशी व स्पाईनसिटी (नवनिर्मित) शाखा तसेच आकुर्डी उपविभागामध्ये चिंचवड, संभाजीनगर व चिखली (नवनिर्मित) शाखा असे प्रत्येकी तीन शाखा कार्यालय राहतील. नव्या भोसरी उपविभाग-२ कार्यालयामध्ये अतिरिक्त कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता, कनिष्ठ अभियंता, सहायक लेखापालचे प्रत्येकी एक पद, निम्नस्तर व उच्चस्तर लिपिकांचे ६ पदे तसेच मुख्य तंत्रज्ञ, शिपाईचे प्रत्येकी एक पद असे १२ पदे मंजूर करण्यात आली आहेत. तसेच नव्या चिखली, इंद्रायणीनगर व स्पाईनसिटी शाखा कार्यालयांमध्ये सहायक अभियंता, प्रधान तंत्रज्ञ, वरिष्ठ तंत्रज्ञ व तंत्रज्ञ, कनिष्ठ कार्यालयीन सहायक असे प्रत्येकी १९ पदे मंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे कामकाजात सुसूत्रता येईल.



> **“भोसरी विधानसभा मतदार संघ आणि समाविष्ट गावांसह औद्योगिक पट्ट्यातील वीज पुरवठा यंत्रणा सुमारे ३० वर्षांपूर्वीची आहे. त्यामुळे वाढती लोकसंख्या, औद्योगिकरण यामुळे वीज मागणीचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढले आहे. त्या तुलनेत महावितरण प्रशासनाने पायाभूत सोयी-सुविधा नाहीत. परिणामी, वीज पुरवठ्याबाबत प्रचंड तक्रारी आणि नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या विधीमंडळात सरकारचे लक्ष वेधले होते. तसेच, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली वेळोवेळी पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले. आगामी काळात ‘वीजसमस्या मुक्त पिंपरी-चिंचवड’ व्हावे, अशी अपेक्षा आहे.**
>
> **– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशन आयोजित कै.चंद्रकांत साठे टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धा उत्साहात सुरू

## टी -ट्वेंटी,स्पर्धा सिल्वर क्रिकेट अकॅडमी व परंदवाल क्रिकेट ॲकॅडमी मैदानावर

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** कै.चंद्रकांत साठे सरांच्या स्मरणार्थ पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनने आयोजित केलेली मर्यादित षटकांची टी -ट्वेंटी,स्पर्धा सिल्वर क्रिकेट अकॅडमी व परंदवाल क्रिकेट ॲकॅडमी मैदानावर येथे (दि.१७) मोठ्या उत्साहात सुरू झाली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय क्रिकेट पंच विनीत कुलकर्णी यांच्या हस्ते सिल्वर क्रिकेट अकॅडमी येथे झाले. या प्रसंगी विनीत कुलकर्णी म्हणाले की, कै.चंद्रकांत साठे सरांसारख्या उत्कृष्ट पंचांच्या नावाने ही स्पर्धा सुरू होत आहे. याचे उद्घाटन करताना मला अतिशय आनंद होत आहे. खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ करून स्पर्धा यशस्वी करावी. तसेच या नाविन्यपूर्ण स्पर्धेच्या मागील हेतू स्पष्ट करताना पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक जगदीश शेट्टी, या प्रसंगी म्हणाले की, ही स्पर्धा पिंपरी चिंचवड शहरामध्ये क्रिकेटचा विकास व्हावा या दृष्टिकोनातून व येथील खेळाडूंना आपले क्रीडा नैपुण्य दाखवण्यास मिळावे यासाठी एक उत्कृष्ट संधी आहे. या संधीचा लाभ सर्व खेळाडूंनी घ्यावा.

या प्रसंगी प्रास्ताविक पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनचे खजिनदार संजय शिंदे यांनी केले व पाहुण्यांची ओळख सचिव राजू कोतवाल यांनी करून दिली. याप्रसंगी पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनचे पदाधिकारी नरेंद्र कदम,मृदुला महाजन, प्रदीप वाघ उपस्थित होते. दरम्यान परंदवाल क्रिकेट अकॅडमीचे मैदान, देहू येथे स्पर्धेचे उद्घाटन विजयसिंह मोहिते यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मुकेश गुजराथी, वसंतभाऊ कोकणे, हर्ष नायर हे उपस्थित होते. प्रास्ताविक मुकेश गुजराथी यांनी केले. सकाळच्या सत्रात पहिला सामना सिल्वर अकॅडमी येथे अजिंक्य क्रिकेट क्लब विरुद्ध एसएनबीपी क्लब यांच्यामध्ये झाला. आदित्य भोसले २८,मनोज कदम ३२,जगदीश जाधव यांनी ९ षटकारांसह ७७ धावा केल्या.सुशील जाधव २६/३.एसएनबीपी क्लब २० षटकांमध्ये १७७ धावा ६ बाद.शुभम तिवारी ७८,सुशील जाधव ३१,केतन गायकवाड ३३.प्रशांत पोळ २४/२,जगदीश जाधव २७/१.अजिंक्य क्लबने हा सामना तीन धावांनी जिंकला.



# खडकवासला धरणाची सुरक्षा रामभरोसे!

## जलाशयात जैव वैद्यकीय कचरा?

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणाच्या जलाशयात बुधवारी जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन करणाऱ्या खासगी कंपनीची खोकी आणि बाटल्या आढळून आल्या. हा प्रकार धरणाची सुरक्षा करणाऱ्या सुरक्षारक्षकाला लक्षात आल्यानंतर तातडीने स्थानिक पोलीस, जलसंपदा विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांनी धरणाकडे धाव घेतली. या प्रकरणी एकाला ताब्यात घेण्यात आले आहे. मात्र, या प्रकारामुळे धरणाची सुरक्षा रामभरोसे असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. खडकवासला धरणाच्या सुरक्षेसाठी तैनात



असलेल्या कर्मचाऱ्यांना बुधवारी दुपारच्या सुमारास जलाशयाच्या पाण्यात मोठ्या प्रमाणात काही खोटी आढळून आली. काही खोकी पाण्याजवळ, तर काही बाटल्या पाण्यात फेकल्याचे निदर्शनास आले. यामध्ये जैववैद्यकीय कचरा असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले. सुरक्षा रक्षकांनी तातडीने ही माहिती जलसंपदा विभाग, पोलिसांना माहिती दिली. जलसंपदाच्या कर्मचाऱ्यांनी पाण्यातून खोकी, बाटल्या बाहेर काढल्या. त्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून धरणाच्या पाण्याची तपासणी करण्याचे काम सुरू करण्यात आले, तर पोलिसांकडून धरणाच्या पाण्यात कोणी खोकी, बाटल्या टाकल्या याबाबत तपास सुरू करण्यात आल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले. दरम्यान, खडकवासला धरणाच्या परिसरात गेल्या काही वर्षांपासून पर्यटकांची गर्दी वाढत आहे. या ठिकाणी अनेक खाद्यपदार्थांच्या गाड्या उभारण्यात आल्या आहेत. त्यामुळे अनेक पर्यटक सुट्यांच्या दिवशी, खासकरुन शनिवार, रविवारी या ठिकाणी गर्दी करतात. धरणाच्या पाण्यात उतरण्यास बंदी आहे. मात्र, अनेक पर्यटक धरणाच्या पाण्यातही उतरतात. त्यामुळे या ठिकाणी सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. धरणाचे पाणलोट क्षेत्र मोठे असल्याने सुरक्षारक्षकांना मर्यादा आहेत. बुधवारच्या प्रकारानंतर दिवसभर धरण परिसरात १३ सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले होते.

> **“जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन करणाऱ्या एका खासगी कंपनीची खोकी आणि बाटल्या खडकवासला धरणाच्या जलाशयात टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले. मात्र, ही खोटी आणि बाटल्या रिकाम्या होत्या. तातडीने ही माहिती स्थानिक पोलीस आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला कळविण्यात आली. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्रदूषण किंवा परिणामांबाबत तपासणी करण्यात येत आहे, तर पोलिसांकडून या प्रकाराबाबत तपास करण्यात येत आहे.**
>
> **-श्वेता कुऱ्हाडे, कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग**

# भाजपने कितीही छळलं तरी नाथाभाऊ झुकनेवाला नहीं!

## एकनाथ खडसेंचा पुष्पास्टाईल इशारा

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आल्यामुळे मला भाजप छळत आहे. त्यांना वाटत आहे, नाथाभाऊ नाउमेद होऊन पुन्हा भाजपकडे येतील. भाजप ने कितीही छळलं तरी नाथाभाऊ झुकनेवाला नहीं असा पुष्पास्टाईल टोला एकनाथ खडसे यांनी भाजप ला लगावला आहे. ते पुण्यात होत असलेल्या भारत विरुद्ध बांग्लादेश क्रिकेट सामना बघण्यासाठी आले तेव्हा त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. एकनाथ खडसे म्हणाले, भारताचा क्रिकेटचा सामना बघण्यासाठी नेहमीच उत्सुक असतो. या अगोदर देखील अनेक क्रिकेटची सामने




बघितले आहेत. टेस्ट क्रिकेट पासून वन-डे आणि टी-ट्वेन्टी हे देखील मॅच बघितले आहेत. क्रिकेटमधील मला काही समजत नाही. पाहण्यामध्ये एक वेगळा आनंद असतो. पुढे ते म्हणाले, १३७ कोटी रुपयांची महसूल विभागाकडून मला नोटीस आलेली आहे. आज तहसीलदारांनी मला नोटीस दिलेली आहे. मला या नोटिशीची कल्पना होती. हा एक राजकीय षड्यंयत्राचा भाग आहे. त्याला योग्य उत्तर देऊ. यात आमच्या गावचे विरोधक चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन यांचा समावेश आहे. म्हणून ते कधी ईडी कधी इन्कम टॅक्स, किंवा नाथाभाऊंची चौकशी करा म्हणून मागे लागतात. गेल्या दोन-तीन वर्षांपासून माझ्या अनेक चौकशी झाल्या. त्यात काही तथ्य निघालं नाही. विरोधकांनी जंग-जंग पछाडले, की ईडीत अटक होईल, देशातील एकमेव उदाहरण आहे की अटक न होता मला जामीन मिळाला आहे. त्यांना चपराक पडली आहे. पुढे ते म्हणाले, ते एक – एक प्रकरण काढत आहेत. त्यांना ईडीत,इन्कटॅक्स काही सापडलं नाही म्हणून इतर चौकश्या लावल्या. मला एनसीपीत आल्यानंतर यांनी छळलं. एनसीपी मध्ये गेल्यानंतर नाथाभाऊ नाउमेद होईल आणि परत भाजपकडे येईल, अस त्यांना वाटत असेल. मी कायमी विरोधी पक्षात राहिलेला माणूस आहे. मी सत्तेच्या विरोधात बोलत आलेलो आहे. आत्ताही भाजपची सत्ता आहे. भाजपच्या ध्येय-धोरणामध्ये चूक असेल ती निदर्शनास आणून देणार. त्यांनी कितीही छळलं तरी मी मांडणार, नाथाभाऊ झुकणे वाला नहीं.

> ### हा एक राजकीय षड्यंयत्राचा भाग
>
> **» टेस्ट क्रिकेट पासून वन-डे आणि टी-ट्वेन्टी हे देखील मॅच बघितले आहेत. क्रिकेटमधील मला काही समजत नाही. पाहण्यामध्ये एक वेगळा आनंद असतो. पुढे ते म्हणाले, १३७ कोटी रुपयांची महसूल विभागाकडून मला नोटीस आलेली आहे. आज तहसीलदारांनी मला नोटीस दिलेली आहे. मला या नोटिशीची कल्पना होती. हा एक राजकीय षड्यंयत्राचा भाग आहे.**

# खेळाडू आरक्षणाच्या तरतुदीमध्ये बदल!

## आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडूंनाच ५ टक्के खेळाडू आरक्षणाचा लाभ

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

खेळाडू आरक्षणाचा लाभ मिळवण्यासाठी राष्ट्रीय आणि राज्य संघटनांमार्फत त्यांच्या स्तरावर तृतीय क्रमांक विभागून देत असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत. त्यामुळे विभागून तृतीय क्रमांक मिळालेल्या खेळाडूंना खेळाडू आरक्षणाचा लाभ देण्याच्या तरतुदीमध्ये बदल करण्यात आला आहे. आता राज्य, राष्ट्रीय स्तरासह आशियाई स्पर्धा, जागतिक क्रीडा स्पर्धा, राष्ट्रकुल स्पर्धा, ऑलिम्पिक स्पर्धेत तृतीय क्रमांक विभागून मिळालेल्या खेळाडूंनाच ५ टक्के खेळाडू आरक्षणाचा लाभ मिळणार असून, खेळ संघटनांमार्फत घोषित तृतीय क्रमांकधारक उमेदवारांना ५ टक्के खेळाडू आरक्षणाचा लाभ मिळणार नाही. शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर तृतीय क्रमांक देण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. काही खेळांच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये एकच तृतीय क्रमांक दिला जातो, त्याच खेळाच्या राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील स्पर्धेत तृतीय क्रमांक विभागून दिला जातो. काही सांघिक खेळांमध्ये विभागून तृतीय क्रमांक दिलेल्या खेळाडूंना ५ टक्के आरक्षणासाठी पात्र ठरवण्यात येते, तर काही सांघिक खेळांमध्ये विभागून तृतीय क्रमांक दिला जात नसल्याने ते खेळाडू आरक्षणासाठी पात्र ठरत नाहीत. केवळ खेळाडू आरक्षणाचा लाभ मिळवण्यासाठी राष्ट्रीय आणि राज्य संघटनांमार्फत त्यांच्या स्तरावर तृतीय क्रमांक विभागून देत असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत. ही बाब वैयक्तिक क्रीडा प्रकारात प्रावीण्य मिळवून खेळाडू आरक्षणातून नोकरीसाठी स्पर्धा करणाऱ्या उमेदवारांसाठी अन्यायकारक आहे. या पार्श्वभूमीवर क्रीडा स्पर्धांमध्ये तृतीय क्रमांक विभागून देण्यात येत असलेल्या संघातील खेळाडूंना आरक्षणाचा लाभ लागू करण्याबाबत राज्य शासनाने निर्णय घेतला. त्यानुसार राज्य, राष्ट्रीय स्तरासह आशियाई स्पर्धा, जागतिक क्रीडा स्पर्धा, राष्ट्रकुल स्पर्धा, ऑलिम्पिक स्पर्धेत तृतीय क्रमांक विभागून मिळालेल्या खेळाडूंनाच ५ टक्के खेळाडू आरक्षणाचा लाभ मिळणार असून, खेळ संघटनांनामार्फत घोषित तृतीय क्रमांकधारक उमेदवारांना ५ टक्के खेळाडू आरक्षण लागू करण्यात येऊ नये. शासन निर्णयानंतर होणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तर क्रीडा स्पर्धांना हा निर्णय लागू होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.



### सांघिक खेळांमध्ये विभागून तृतीय क्रमांक दिलेल्या खेळाडूंना आरक्षण

» काही खेळांच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये एकच तृतीय क्रमांक दिला जातो, त्याच खेळाच्या राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील स्पर्धेत तृतीय क्रमांक विभागून दिला जातो. काही सांघिक खेळांमध्ये विभागून तृतीय क्रमांक दिलेल्या खेळाडूंना ५ टक्के आरक्षणासाठी पात्र ठरवण्यात येते, तर काही सांघिक खेळांमध्ये विभागून तृतीय क्रमांक दिला जात नसल्याने ते खेळाडू आरक्षणासाठी पात्र ठरत नाहीत.

# पुढील शैक्षणिक वर्षी 'एक राज्य एक गणवेश'

## विद्यार्थ्यांना समान रंगाचे दोन गणवेश देण्यात येणार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत राज्यातील शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. त्या अंतर्गत राज्यात पुढील शैक्षणिक वर्षी, शैक्षणिक वर्ष २०२४-२५पासून एक राज्य एक गणवेश धोरण राबवले जाणार असून, विद्यार्थ्यांना समान रंगाचे दोन गणवेश महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत देण्यात येणार आहेत. शालेय शिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला.



चालू शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला 'एक राज्य एक गणवेश' धोरण राबवण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला होता. मात्र शाळा सुरू होण्यास काहीच दिवस बाकी असताना घेतलेल्या या निर्णयामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर आता एक राज्य एक गणवेश धोरणाची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार, शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील सर्व मुली, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील मुले, दारिद्र्यरेषेखालील पालकांच्या मुलांना मोफत गणवेश देण्यात येतो. राज्यातील पात्र असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना एक रंग, एक दर्जा असलेला समान गणवेश देण्याच्या दृष्टीने कापड खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबवण्यासह तांत्रिक कार्यवाही महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत करण्यात येणार आहे. गणवेश स्काउट आणि गाईड विषयास अनुरूप असावा. मुलांसाठी आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळ्या रंगाची पँट किंवा हाफ पँट, मुलींना आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळ्या रंगाचा स्कर्ट किंवा गडद निळ्या रंगाची सलवार, आकाशी रंगाची कमीज असे गणवेशाचे स्वरूप आहे. एका गणवेशाला विद्यार्थ्यांच्या शर्टवरती शोल्डर स्ट्रिप आणि दोन खिसे असणे आवश्यक आहे. गणवेश शिलाईचे काम स्थानिक महिला बचत गटामार्फत करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाकडून सहकार्य घेण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने करावी, असे नमूद करण्यात आले आहे.

सर्व पात्र विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश देण्यात येणार आहे. मोफत गणवेश योजनेबाबत शाळा, शाळा व्यवस्थापन समितीमार्फत स्थानिक स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात येऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.